क्र.२/नसवि/महासभा/ ०२ /२०१२-२०१३
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- १२ मे २०१२

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०२ /२०१२-२०१३

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,

पा. ----------

सदस्य/सदस्या,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (एए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक १९/०५/२०१२ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ट

१. मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०४/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवट्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिकेच्या मिरज पंढरपूर रस्त्यावर तासगाव फाटा येथे मालगाव हद्दीमध्ये दिलासा भवन ही सामाजिक संस्था एच.आय.व्ही./एड्स बाधित रुग्णांसाठी कार्यरत असून, त्यांनी दि.१३/१२/२०११ च्या पत्राने संस्थेस पाणी पुरवठ्याची सोय नसल्याने, त्यांनी मगदुम मळा भागासाठी बांधणेत आलेल्या उंच टाकीतून पाणी पुरवठा करणेबाबत मागणी केली आहे. मगदुम मळा उंच टाकीपासून सदर केंद्र अंदाजे २.५० कि.मी.अंतरावर असून, महापालिका हद्दीबाहेर आहे. सदरची संस्था ऊर्जित असलेले कार्य ध्यानात घेवून उंच टाकी ते केंद्रापर्यंतची पाईप लाईन टाकून सदर संस्थेने घेतल्यास त्यांना पाणी कनेक्शन जोडून देणे शक्य आहे. सदर संस्थेने रितसर मनपा तरतुदीनुसार संपूर्ण पाईप लाईन टाकणेचा खर्च संस्थेने करुन पाईप लाईन मनपाकडे हस्तांतरीत करुन तसेच, रु.१००/- मात्रच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेवून पाणी कनेक्शन देणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,मिरज) यांचे दि.१८/०४/२०१२ चे विषयपत्र.**

५. युवा विकास कल्याणकारी संस्था सांगलीवाडी यांना समुपदेशन केंद्र चालविण्यासाठी मा.महासभा ठराव क्र.१०२ दि.२०/०१/२०१० अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर संस्थेने सांगलीवाडी जुना जकात नाका या जागेत आरोग्य विभागाच्या हजेरी कामात बाधा येणार नाही अशा पद्धतीने समुपदेशन केंद्रासाठी जागेचा वापर करण्यास मागणी केली आहे. त्यानुसार युवा विकास कल्याणकारी संस्था,सांगलीवाडी यांना समुपदेशन केंद्रासाठी सांगलीवाडी जुना जकात नाका येथे जागा देणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२०/०४/२०१२ चे विषयपत्र.**

६. अपंग सेवा केंद्र सांगली या संस्थेच्या मागणी प्रमाणे स.नं.३१०/३ (सि.स.नं.६१३३) एकूण क्षेत्र १४३.५० चौ.मी. खुल्या जागेपैकी १०% म्हणजे १४.३५चौ.मी. जागा प्रतिवर्षी रु.३०००/- मात्र भाडे दराने प्रति तीन वर्षानंतर अस्तित्वातील भाड्यात २०% दरवाढ करुन व उर्वरित ८४९.१५ चौ.मी. खुले क्षेत्र देखभाल व खुल्या ठेवण्याच्या अटीवर अपंगांना सोईसुविधा पुरविणेसाठी महापालिकेच्या शर्ती-अटीवर २९ वर्षे मुदतीने भाडे पट्ट्याने देणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/१२/२०११ चे विषयपत्र.**

७. सांगली मिरज आणि औद्योगिक क्षेत्र मिरज येथील स.नं.१४०/१ व १४०/२ मधील निवासी भूखंड क्र.आर.२१ ते आर. ३१ क्षेत्रफळ अंदाजे १.५० हे.आर. जमिन महानगरपालिकेकडे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी पुर्नवसन योजनेसाठी हस्तांतरण करणेस औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. सदर क्षेत्रासाठी मुल्यांकनानुसार प्रचलित निवासी दर रु.११३५/- प्रति चौ.मी. प्रमाणे होणाऱ्या एकूण रु.१,७०,२५,०००/- रक्कमेच्या २५% प्रमाणे होणारी र.रु.४२,५६,२५०/- इतक्या रक्कमेस हस्तांतरण करणेस मान्यता दिली आहे. त्यानुसार देय रक्कमेचा भरणा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडे भरणेस धोरणात्मक मान्यता देणेबाबत **उपायुक्त (नादानिक) यांचे दि.१०/०५/२०१२ चे विषयपत्र.**

८. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

९. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

प्र.महापालिका सचिव,

मा.महापौर, यांचे सम्मतीने दाखल

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- १८

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण महासभा दि.२०/०४/२०१२ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. ०१ ते ठराव क्र. १७ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक

अनुमोदक :-

कार्यवृत्त सर्वानुमते मंजुर

महापौर,

सहाय्यक आयुक्त (म.स.)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- १९

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचे ठराव

महानगरपालिकेचे माजी नगरसेवक प्रशांत आण्णासाहेब खिलारे यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. ते एक संयमी,सहनशील व मनमिळावू व्यक्तीमत्वाचे होते. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्गती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.आशा नितिन शिंदे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :-१९/०५/२०१२

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- 20

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचे ठराव

महानगरपालिकेच्या मिरज विभागीय कार्यालय बांधकाम विभागाकडील कनिष्ठ अभियंता कै.पी.जी.आवळे यांचे अल्पशा आजाराने नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्गती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.विजयकुमार हाबळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

उपायुक्त/आयुक्त

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- 29

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे सभापती पदी श्री.इब्राहिम चौधरी यांची बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.इब्राहिम चौधरी यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.आशा नितिन शिंदे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- 22

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

मा.आर.आर.पाटील स्पोर्टस् सोशल अॅकॅडमीचे अध्यक्ष श्री.अनिल पांडूरंग हिप्परकर यांना शक्ती फौंडेशनकडून समाज सेवा विशेष पुरस्कार व युवाशक्ती,व्यसनमुक्ती व एडस् प्रतिबंधक संस्कार केंद्र यांच्या वतीने युवाशक्ती पुरस्कार प्रदान करणेत आला त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.अनिल पांडूरंग हिप्परकर यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.मकरंद देशपांडे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सहा.आयुक्त/अधिकारी

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- 23

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सदस्या सौ.विद्याताई उत्तमराव कांबळे यांचे पती श्री.उत्तमराव संपतराव कांबळे यांना १ मे २०१२ रोजी त्यांच्या सामाजिक,राजकिय,सहकार,शैक्षणिक,सांस्कृतिक,कला आणि क्रिडा क्षेत्रातील अनमोल योगदानाबद्दल युवाशक्ती,व्यसनमुक्ती व एडस् प्रतिबंध संस्कार केंद्र,सांगली यांच्या वतीने युवाशक्ती पुरस्कार प्रदान करणेत आला. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.उत्तमराव संपतराव कांबळे यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.विमल पांडूरंग हिप्परकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- २४

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परिक्षेत डॉ.बापट बाल शिक्षण मंदिरची विद्यार्थीनी कुमारी तन्वी प्रविण केळकर हीने राज्यात प्रथम क्रमांक मिळविला. तिच्या या यशामुळे सांगली शहराचे नावलौकीक संपूर्ण राज्यभर व देशात परसले आहे. तसेच सांगली शिक्षण संस्थेचे ६१ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा कुमारी तन्वी प्रविण केळकर आणि गुणवत्ता यादीत आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किरण सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.राजू गवळी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- २५

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१८/०४/२०१२ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

महानगरपालिकेच्या मिरज पंढरपुर रस्त्यावर तासगाव फाटा येथे मालगाव हद्दीमध्ये दिलासा भवन ही सामाजिक संस्था एच.आय.व्ही./एड्स बाधित रुग्णांसाठी कार्यरत असून, त्यांनी दि.१३/१२/२०११ च्या पत्राने संस्थेस पाणी पुरवठ्याची सोय नसल्याने, त्यांनी मगदुम मळा भागासाठी बांधणेत आलेल्या उंच टाकीतून पाणी पुरवठा करणेबाबत मागणी केली आहे. मगदुम मळा उंच टाकीपासून सदर केंद्र अंदाजे २.५० कि.मी.अंतरावर असून, महापालिका हद्दीबाहेर आहे. सदरची संस्था करीत असलेले कार्य ध्यानात घेवून उंच टाकी ते केंद्रापर्यतची पाईप लाईन टाकून सदर संस्थेने घेतल्यास त्यांना पाणी कनेक्शन जोडून देणे शक्य आहे. सदर संस्थेने रितसर मनपा तरतुदीनुसार संपूर्ण पाईप लाईन टाकणेचा खर्च संस्थेने करुन पाईप लाईन मनपाकडे हस्तांतरीत करुन तसेच, रु.१००/- मात्रच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेवून व वॉर्डातील नागरीकांची पाण्याची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेवून सदर संस्थेस पाणी कनेक्शन देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature] ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक [signature] महापौर,

कार्य.अभियंता (पा.पु.)

[signature]

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- २६

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२०/०४/२०१२ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

युवा विकास कल्याणकारी संस्था सांगलीवाडी यांना समुपदेशन केंद्र चालविण्यासाठी मा.महासभा ठराव क्र.१०२ दि.२०/०९/२०१० अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर संस्थेने सांगलीवाडी जुना जकात नाका या जागेत आरोग्य विभागाच्या हजेरी कामात बाधा येणार नाही अशा पद्धतीने समुपदेशन केंद्रासाठी जागेचा वापर करण्यास मागणी केली आहे. त्यानुसार युवा विकास कल्याणकारी संस्था,सांगलीवाडी यांना समुपदेशन केंद्रासाठी सांगलीवाडी जुना जकात नाका येथे जागा देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक उपायुक्त

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- २८

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/१२/२०११ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

महानगरपालिका हद्दीतील सांगली येथील स.नं.३१०/३ या मंजूर रेखांकनातील म्हणजेच विस्तारीत सि.स.नं.६९३३ या जागेमधील १०% खुली जागा विकसीत करणेसाठी व उर्वरीत क्षेत्र देखभाल दुरुस्तीसाठी मिळणेबाबत अंपग सेवा केंद्र सांगली या संस्थेने मागणी केली आहे.

महानगरपालिका क्षेत्रात मंजूर रेखांकनातील अनेक खुल्या जागा मनपाच्या ताब्यात आलेल्या आहेत. या खुल्या जागा विकसीत करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे दुरापास्थ आहे. त्याचप्रमाणे मनपाची आर्थिक स्थिती विचारात घेता सर्व खुल्या जागांचा विकास करणे शक्य होत नाही. परिणामी अशा खुल्या जागा या अतिक्रमणग्रस्थ होतात किंवा त्याठिकाणी निर्माण होणाऱ्या अस्वच्छतेमुळे त्या शहरास व त्या परिसरातील रहिवाशांना उपद्रवकारक ठरतात. त्यामुळे अशा जागा समाजातील उपेक्षीत/व्यंग/अपंग अशा लोकांच्या सामाजिक कार्यास वाहून घेतलेल्या संस्थांना दिल्यास अशा समाज कार्यास महापालिकेचा हातभार लागेलही शिवाय महापालिकेच्या खुल्या जागा अतिक्रमणग्रस्थ व नागरीकांना उपद्रवकारक ठरणार नाहीत असे या सभेचे मत आहे. अपंग सेवा केंद्र सांगली ही नोंदणीकृत संस्था असून, सदर संस्था ही समाजातील अपंगांना वैद्यकीय,आर्थिक व इतर साहित्य वाटप करुन मदत करीत असतात. सदर संस्था सामाजिक जाणीव व कर्तव्य भावनेने काम करीत असल्याने, अपंग सेवा केंद्र सांगली या संस्थेच्या मागणी प्रमाणे स.नं.३१०/३ (सि.स.नं.६९३३) एकूण क्षेत्र ९४३.५० चौ.मी. खुल्या जागेपैकी १०% म्हणजे ९४.३५चौ.मी. जागा प्रतिवर्षी रु.३०००/- मात्र भाडे दराने प्रति तीन वर्षानंतर अस्तित्वातील भाड्यात २०% दरवाढ करुन व उर्वरित ८४९.१५ चौ.मी. खुले क्षेत्रात उद्यान विकसीत करणेच्या तसेच देखभाल दुरुस्तीसह ते नागरीकांना खुले ठेवणेच्या अटीवर अपंगांना सोईसुविधा पुरविणेसाठी महापालिकेच्या शर्ती-अटीवर २९ वर्षे मुदतीने भाडे पट्टयाने देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सदर संस्थेस १०% जागेवर भविष्यात बांधकाम करणेस मान्यता देणेत येत असून, त्यासाठी योग्यतो परवाना माहानगरपालिकेमार्फत देणेची कार्यवाही ठेवावी असे ही सभा आदेशीत करीत आहे.

सूचक

ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-११/०५/२०१२

ठराव क्रमांक :- २६

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (जादानिक विभाग) यांचे दि.१०/०५/२०१२ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

सांगली मिरज आणि औद्योगिक क्षेत्र मिरज येथील स.नं.९४०/१ व ९४०/२ मधील निवासी भूखंड क्र.आर.२१ ते आर. ३१ क्षेत्रफळ अंदाजे १.५० हे.आर. जमिन महानगरपालिकेकडे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी पुर्नवसन योजनेसाठी हस्तांतरण करणेस औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. सदर क्षेत्रासाठी मुल्यांकनानुसार प्रचलित निवासी दर रु.११३५/- प्रति चौ.मी. प्रमाणे होणाऱ्या एकूण रु.१,७०,२५,०००/- रक्कमेच्या २५% प्रमाणे होणारी र.रु.४२,५६,२५०/- इतक्या रक्कमेस हस्तांतरण करणेस मान्यता दिली आहे. त्यानुसार देय रक्कमेचा भरणा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडे भरणेस धोरणात्मक मान्यता देणेबाबतच्या विषयावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा करणेत आली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज दुर्गानगर झोपडपट्टी येथील रहिवाशांच्या कब्ज्यात असलेली जागा औद्योगिक विकास महामंडळाची जागा त्यांच्याकडून विकत घेण्याच्या प्रस्तावास विरोध दर्शविण्यासाठी दुर्गानगर येथील रहिवाशांनी महापालिकेवर मोर्चा काढुन सदरचा प्रस्ताव रद्द करणेची मागणी मोर्चाद्वारे करणेत आलेली आहे. दुर्गानगर झोपडपट्टी ही सद्यस्थितीत झोपडपट्टी राहिली नसून त्याठिकाणी ५०% हून जास्त पक्की घरे झालेली आहेत. तसेच, महापालिकेने याठिकाणी काँक्रिटचे रस्ते,गटारी,लाईट,पाणी, स्वच्छतागृहे इत्यादी सुविधासह अंतर्गत रस्त्यावर पेव्हींग ब्लॉक बसविलेले आहेत. त्यामुळे आता दुर्गानगर ही झोपडपट्टी न राहता ती एक चांगली वसाहत निर्माण झालेली आहे असे या सभेचे मत असून, प्रस्तावामध्ये नमुद केलेला स.नं.९३७ असा आहे तर प्रत्यक्षात ही जागा स.नं. ९४० वर असलेने प्रस्तावामध्ये तफावत दिसून येते.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता व तेथील रहिवाशी नागरीकांचा विरोध लक्षात घेता त्याठिकाणी जबरदस्तीने झोपडपट्टी पुर्नवसन योजना राबविणे योग्य होणार नाही असे या सभेचे मत आहे.

सबब, झोपडपट्टी पुर्नवसन योजनेसाठी मिरज येथील स.नं.९४०/१ व ९४०/२ मधील निवासी भूखंड क्र.आर-२१ ते आर-३१ क्षेत्रफळ १.५० हे.आर.जमिन महानगरपालिकेकडे रु.४२,५६,२५०/- इतक्या रक्कमेस हस्तांतरण करणेचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे.

सूचक ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका